# सद्यकालीन अल्पभुधारक शेतकरी,शेती आणि समस्या

**संशोधन कर्ती**
**लीना वि. गादेवार**
M. G. Arts, Sci & Late N. P. Com. College
Armori
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**मार्गदर्शक**
**प्राचार्य डॉ. ज्ञानेशवर गुरु म्हशाखेत्री**
कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय चार्मीशी
जिल्हा गडचिरोली

---

***सारांश :***

*सद्याचे युग हे जागतीकरणाचे आहे. सर्वच क्षेत्र आज विकासाच्या दिशेने वाटचाल केल्याचे दिसून येते. त्याला शेती क्षेत्र सुध्दा अपवाद नाही. शेती विकासावर आज शासनांचे विविध योजना, वित्तीय तरतूदी आणि वित्तीय संस्थंना पूर्णपणे सहकार्य करण्या करिता सकारात्मक पाऊले उचलीत आहेत. समस्या हया शेतकरी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भारतातील त्यातल्या त्यात महाराष्ट्रातील शेतक-याच्या आत्महत्या या आज आंतराष्ट्रीय स्तरावर चिंतेचा आणि चर्चेचा विषय झालेला आहे. शेतकरी समस्या मुक्त करण्या करीता सर्वच स्तरातून प्रयत्न होत आहेत. तरी सुध्दा आज विशेषता अल्पभुधारक शेतकरी दारिद्रयाच्या खाईत, गाडलेला दिसून येतो. विकासाचा आशेचा किरण अजुनही बहूतेक शेतक-याच्या जीवनापासून खूप दुर असल्याचे दिसुन येत. प्रस्तुत लेखामध्ये अल्पभूधारक शेतक-याची सद्यकालीन स्थिती, जीवन, समस्या आणि शेतीची रचना प्रामुख्याने अभ्यासला आहे.*

**प्रमुख शब्द :** समस्या, शेती, विकास, नियोजन, आर्थिक विकास, उपाययोजना इत्यादी.

---

**संशोधनाची उद्दिष्टे** :

1. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्यांचा आढावा घेणे.
2. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शैक्षणिक समस्येचा आढावा घेणे.
3. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासाकरिता शासकीय योजनांचा आढावा घेणे.
4. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडवण्याकरिता उपाययोजना सुचवणे.

**तथ्य संकलन** :

प्रस्तुत शोध निबंध लिहीत असताना प्रामुख्याने दुय्यम स्वरूपाची माहिती तथ्याचा वापर करण्यात आला आहे . पुस्तके , लेख, मासिके वर्तमानपत्र इत्यादींच्या माध्यमातून माहिती सांगितली आहे.

**प्रस्तावना :**

शेती करतो तो भूमिपुत्र म्हणजे शेतकरी. शेती हा भारतीयांचा मुख्य व्यवसाय असून त्या निगडीत असलेल्या विविध सहाय्यक कृषि उद्योगावर भारतीय अर्थव्यवस्था निर्भर करते. शेतकरी सुखी तर राष्ट्र सुखी हा प्राथमिक कालखंडापासून लागू असलेली म्हण आज सुध्दा कार्यरत आहे.

Research Hub International Journal

भारतामध्ये शेतक-याची शेती धारण क्षेत्रफळ उत्पन्न यानुसार श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी,अल्प भूमी धारक शेतकरी इत्यादी प्रामुख्याने वर्ग दिसून येतात. मुख्य समस्यांनी राखलेला वर्ग म्हणजे अल्प भूधारक शेतकरी अशा महाराष्ट्रातील प्रमुखतः विदर्भातील नागपूर जिल्हयातील अल्प भूधारक शेतक-यांच्या जीवनातील समस्यांचे परिस्थितीचे सर्वांगीण अभ्यास केलेला आहे.

अल्पभूधारक शेतक-याची शेती धारणा ज्या शेतक-यांकडे २ ते ५ एकर शेती आहे असे शेतकरी अल्प भूधारक गटात येतात. अत्यल्प शेती क्षेत्र असल्याने त्याचे कृषि उत्पन्न हे अत्यल्प असते. त्या अनुशंगाने त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनस्तरात प्रयत्न,उपाय योजना आणि राष्ट्रीय अर्थ स्वरुपामध्ये असलेला तरतूदीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

शेती क्षेत्राचा नियोजन करण्या करिता शेती नियोजन शेतक-यांना आज समजवण्यात येत आहे. ठिंबक सिंचन, उपसा सिंचन, विविध रासायनिक खते इत्यादिंचा सविस्तर उपयोग आज गावामध्ये कृषिमित्र, तलाठी, ग्रामसेवक इत्यादींचे मार्गदर्शन घेतले आहे. पिकाची गुणवत्ता वाढविण्यासाठी महत्वाचे असणारे घटक जसे जमीन, पाणी, हवामान, बाजारपेठ, मजुरांची उपलब्धता, दळणवळण इत्यादी लक्ष वेधणे आज काळाची गरज ठरली आहे. शेतक-याचे सक्षमीकरण करणे आज काळाची गरज ठरलेली आहे.

**ग्रामीण विकासाची परिवर्तनकारी शक्ती :**

भारताच्या विकासाबरोबर लक्ष केंद्रित केले आणि पुढील दोन दशकांत देशाचे रुपांतर विकसित अर्थव्यवस्थेत होईल अशी कल्पना केली तर तो प्रवास निर्विवाद पणे ग्रामीण भारताच्या मार्गाने जातो. देशाच्या सुमारे दोन तृतीयांश लोकसंख्येचे आश्रयस्थान असलेला हा विशाल भूभाग 'जीडीपी' मध्ये (एकूण देशांतर्गत उत्पादन) अंदाजे ४६ टक्के योगदान देतो. या आकडेवारी तून दरडोई उत्पन्नातील वाढीची अफाट शक्यता दिसून येते. कारण जीवनमान सुधारत आहे आणि खर्च करण्यायोग्य उत्पन् वाढत आहे. परिणामी उत्पादनांची मागणी वाढेल त्यामुळे बाजारपेठेत सखोल प्रवेशाला चालना मिळेल आणि सरतेशेवटी कार्पोरेट उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल.

**प्रेरणादायी वाटचाल :**

सरकारने पंतप्रधान ग्रामसडक योजना, जल जीवन मिशन यांसारख्या योजना राबवून या परिवर्तनाला चालना दिली आहे. शेतीवर अवलंबून असणा-यांचे ग्रामीण जीवनमान उंचावणे हे या उपक्रमांचे उदिदष्ट आहे. इतिहास आणि आंतरराष्ट्रीय अनुभवातून अशीच कहाणी पुढे येते. ग्रामीण आर्थिक विकास बहुतांश वेळेस शेतीवर आधारित अर्थव्यवस्थे कडून उत्पादन आणि सेवांचे मनुष्यबळ असलेल्या अर्थव्यवस्थेकडे वळतो. भारतालाही याच मार्गाने जाण्याची आकांक्षा आहे. चीन प्रमाणेच उत्पादन क्षेत्राचे 'जीडीपी' मधील योगदान सध्याच्या १७ टक्क्यांवरुन ३० ते ३२ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची योजना आखण्यात आली आहे. भारतात आज ४१.५ टक्के मनुष्यबळ शेतीत गुंतलेले आहे. तरीही 'जीडीपी' मध्ये या क्षेत्राचे योगदान केवळ १६ टक्के आहे. सरकारने उत्पादनवाढीवर दिलेला भर ग्रामीण 'जीडीपी' साठी चांगला असून, 'मेक इन इंडिया', उत्पादनाशी निगडीत प्रोत्साहन योजना आणि राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण यांसारख्या कार्यक्रमां मुळे त्याला बळ मिळाले आहे. या प्रयत्नांना यश आले असून, नवे उत्पादन प्रकल्प आर्थिक वर्ष २०२० मधील ३.८ लाख कोटी रुपयांवरुन आर्थिक

वर्ष २०२३ मध्ये १३.२ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहेत. भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था परिवर्तनाच्या उंबरठयावर उभी आहे. ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्नाने दोन हजार डॉलरचा टप्पा ओलांडला असून, हा उपभोग क्षेत्राच्या दृष्ट्रीने एक मैलाचा दगड आहे. शहरी भारताने आर्थिक वर्ष २०१२ मध्ये हा टप्पा गाठला होता. या स्थित्यंतरामुळे उत्पादन कंपन्यांच्या महसुलात आणि नफ्यात वाढ झाली. ग्राहक स्वेच्छा कंपन्यांची आकारमान वाढ कमी राहिली, तरी प्रति युनिट उच्च रिअलायझेशनमुळे उत्पन्नवाढीस गती मिळाली आहे. उपभोग-आधारित परिवर्तनाचा हा पुरावा आहे.

**ग्रामीण विकास संकल्पनेवर आधारित नवा फंड :**

अशा ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचा लाभ उठवू इच्छिणारे गुंतवणूकदार आयसी आयसीआय प्रुडेन्शियल रुरल अपौच्र्युनिटीज फंडाचा विचार करु शकतात. ही ओपन-इंडे इक्विटी योजना ग्रामीण भारताच्या विकासाला चालना देणारी आणि त्याचा लाभ घेणारी क्षेत्रे आणि कंपन्यांवर केंद्रित आहे. ही नवी योजना (एनएफओ) नऊ जानेवारी रोजी खुली झाली असून ती २३ जानेवारी २०२५ पर्यत सुरु असेल.

आपली खरी शक्ती नैसर्गिक साधनामध्ये आहे. या शक्तीला प्राधान्य दिल्यास हा देश आत्मनिर्भर होईल एवढेच नव्हे तर अन्य कित्येक देशांची भूक भागवू शकेल. सर्वच शेत मालाचे भाव पडले आणि कर्जफेड करता येत नाही म्हणजे आत्महत्या होतात असे म्हणता येणार नाही. पण दारिद्र्याा मुळे कर्जाच्या अनुपलब्धते मुळे बाजारातील मंदी मुळे सुयोग्य नियोजनाच्या अभावामुळे व संवेदनहिते मुळे जेव्हा आत्महत्या होतात. त्याची जबाबदारी शासनाने स्विकारली पाहिजे असे संवेदनशील शासनच शेतक-यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करू शकेल आणि शेतक-यांना योग्य दिलासा व न्याय देवू शकेल.

महाराष्ट्राच्या विदर्भ विभागातील शेतक-यांला आत्महत्या शेती साठी घेतलेल्या कर्जाच्या बोजामुळे होत आहे. असे सर्वसाधारण पणे मानल्या जात आहे. परंतु पुणे स्थित यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन आणि अकादमीने (यशदा) केलेल्या पाहणीनुसार शेतीसाठी घेतलेले कर्ज हेच शेतक-यांच्या आत्महत्यांचे एकमेव कारण नसल्याचे दिसून येत आहे. सर्वात वाईट बाब म्हणजे राज्य सरकार तर्फे आत्महत्या झालेल्या कुटुंबास दिली जाणारी आर्थिक भरपाई हे सुद्धा आत्महत्यांच्या कारणापैकी एक असल्याचे निदर्शनास आले. राज्यसरकारच्या अधिका-याच्या म्हणण्यानुसार जागतिक कापूस बाजारपेठेतील बदलत्या परिस्थितीचा विदर्भातील शेतकरी आत्महत्यांशी संबंध आहे. मागील दशकात जागतिक बाजारपेठेत कापसाच्या किंमती झपाट्याने खाली येत आहे. या बरोबरच भारतातील कापूस शेतीतून शेतक-यास मिळणारा लाभही स्वाभाविकपणे घटत आहे. यशदाने केलेल्या सर्वेक्षणानुसार गेल्या ५ वर्षात यवतमाळ विभागात तीन हजार पाचशे बहात्तर आत्महत्याची नोंद झाली आहे. या आत्महत्यापैकी ७५ शेतीशी संबंधीत आहे. २० आत्महत्या शेतीशी संबंधित नाही. लोचन यांच्या निवेदनानुसार जवळपास ४३ आत्महत्या गंभीर आजार आणि वैद्यकीय उपचारांसाठी झालेल्या प्रचंड खर्चाशी संबंधित आहे. लोचन यांनी आत्महत्या रोखण्यासाठी प्रत्येक ब्लाकमध्ये दोन याप्रमाणे परामर्श केंद्र उभारण्यात यावीत. तसेच किफायतशीर व व्यापक वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यात याव्यात अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

**सद्य काळात शेतीविकासात आवश्यक ठरणारे घटक :**

1. माती संसाधन व्यवस्था
2. जमीनीच्या पोतनुसार पिकाची निवड

3. जलसिंचनाचे प्रमाण आणि प्रकार
4. नैसर्गिक आपत्ती निवारण आणि समस्या उपाययोजना
5. शेती निगडीत जोड व्यवसाय आणि विकास
6. राष्ट्रिय कृषी संस्थाची भुमिका
7. शासन आणि प्रशासन राज्य कर्त्याची भुमिका
8. आंतर पिक, मिश्र पिक व्यवस्थापन
9. मृदा तपासणीकरण
10. खते आणि आधुनिक ज्ञान माहिती

**शेतीविकासासाठी निधारित आणि आवश्यक असणारे घटक :**

फायद्याची शेती करण्याकरिता उचित नियोजन असणे ही काळाची गरज आहे. तेव्हाच देशातील शेतक-याच्या आत्महत्या थांबणे अपेक्षित आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात आज आत्महत्येचे सत्र सुरु आहे. एकटया मराठवाडयात ९४८ शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा शेतक-याच्या आत्महत्याकरीता कुप्रसिध्द आहे. एकंदरित २ ते ३ शेतकरी दर दिवशी भारतात आत्महत्या होतात.

1. शासन आपल्या दारी
2. कसेल त्याची शेती
3. जलयुक्त शिवार
4. वणशेती

इत्यादी प्रमुख उपाययोजना शासनाने

**निष्कर्ष :**

शासनाने शहरीकरणा वर नियंत्रण आणावे. ते नियंत्रण आणण्यासाठी विकासाचे लक्ष ग्रामीण क्षेत्रावर केंद्रीत करावे. ग्रामीण क्षेत्रात शहरातील सर्व सोयी उपलब्ध करून द्याव्यात. आज तसे फारसे करणे कठीण नाही. गरज इच्छा शक्तीची आहे. छोटे छोटे उद्योग कुटीर उद्योग गावोगावी उघडावे. त्यामुळे लोकांना जोडधंदाही मिळेल व त्यांची आर्थिक स्थिती डबघाईला येणार नाही. असे केल्याने होण्याऱ्या आत्महत्येवर ब-याच प्रमाणात नियंत्रण करता येऊ शकते. ज्या ठिकाणी सिंचनाच्या सोयी नाही त्याठिकाणी त्या कराव्यात. ज्यामुळे बारामाही पिके शेतक-याला घेता येतील. यातून त्यांची आर्थिक समृद्धी वाढल्यास सहज मदत होवू शकते. यांनी शेती बरोबरच शेतीपूरक जोडधंदे करून आपले उत्पादन वाढविल्यास आर्थिक स्थिती सुधारता येते.

विविध उपाय अमलात आणल्यास ग्रामीण क्षेत्रातील अनेक समस्यावर भविष्यात सहज नियंत्रण करता येईल. शहरीकरणाची आंधळी प्रक्रीया थांबविता येईल. ग्रामीण संस्कृतीचे जतन होईल. विकास आणि संस्कृतीची अस्मिता वाढविण्यासाठी विकासाचे गांधी मॉंडल प्रभावी ठरू शकते हे मॉंडेल प्रत्यक्ष उतरविण्याची गरज आहे. नविन उद्योग ग्रामीण क्षेत्रात उघडावे. क्षत्रिय गरजानुसार उत्पादनानुसार शिक्षणाची व्यवस्था करावी त्यामूळे एका नव्या रूपाने ग्रामीण क्षेत्र स्वावलंबी तर बनतिलच त्यांची सामाजिक आर्थिक शैक्षणिक पातळी देखील उंचावण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- डॉ. तोष्णीवाल एस. आर. : भारतातील सामाजिक समस्या विश्व प्रकाशन महाल नागपूर १९९७
- डॉ. देवगावकर व डॉ. डुमरे : सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन श्री साईनाथ प्रकाशन धरमपेठ नागपूर २००९
- मेश्राम वर्षा : संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हे नवदीप पाचघरे प्रकाशन नागपूर
- सवदी ए. बी. : 'द मेगा स्टेट महाराष्ट्र' निराली प्रकाशन शिवाजीनगर पुणे-०५
- प्रा. डॉ. मनवर डी. एस. : भारतीय समाज: प्रश्न आणि समस्या
- प्रा. गुप्ता एम. एस., डॉ. शर्मा डी. डी. : भारतीय सामाजिक समस्याएँ


Research Hub International Journal